महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

Email ID : lnjd-desk७@mah.gov.in दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संकीर्ण- २०२६/प्र.क्र.२२/का. ७ दिनांक : १० एप्रिल, २०२६.

## निविदा सूचना

विधि व न्याय विभाग (खुद्द) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई मधील प्रिंटर्समध्ये वापरण्यात येत असलेली Compatible **टोनर व ड्रम** (निकामी व पूर्नवापर/रिफिलिंग करता येत नसलेली) सोबत जोडलेल्या यादीमधील **एकूण २१४ नग व एकूण ०८नग ड्रम** तसेच दरकरार होईपर्यंत दिनांकास जमा होणारे टोनर व ड्रम इ. **निर्लेखित सामग्री,** आहे त्या स्थितीत विक्री करायची आहे. तसेच विभागात पुढील कालावधीत **जमा होणारी उपरोक्तप्रमाणे टोनर व ड्रमचे निर्लेखन करुन,** आहे त्या स्थितीत दरमहा विक्री करण्याकरिता **एक वर्षाकरिता दरकरार करावयाचा आहे.** त्याकरिता सदर साहित्य खरेदी करण्यास इच्छूक व्यक्ती अथवा संस्थांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

सुचना:-

१) सदर निविदा तांत्रिक लिफाफा व अतांत्रिक लिफाफा असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे (सोबत जोडलेल्या नमुन्यात) कार्यासन अधिकारी (कार्यासन-७), दालन क्रमांक ३५३, तिसरा मजला, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे **दि.२०.०४.२०२६ पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा रितीने पाठवावेत.** त्यानंतर आलेल्या निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत. दोन लिफाफा पध्दतीने निविदा सादर न केल्यास निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

२) सदर निविदा मा. प्रधान सचिव व विधि परामर्शी यांनी दिलेल्या दिनांकास व वेळेला मा. प्रधान सचिव व विधि परामर्शी, पाचवा मजला, मुख्य इमारत, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२ येथे उघडण्यात येतील. निविदा धारकांना निविदा उघडण्याची दिनांक व वेळ पत्राद्वारे/दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. निविदा मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल (मंत्रालय प्रवेश नियमानुसार). निविदाधारक हजर न राहिल्यास त्याच्या गैरहजेरीमध्ये निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

३) सदर साहित्यांचे निरीक्षण करु इच्छिणाऱ्या संबंधित व्यक्ती/संस्थेने कक्ष अधिकारी (कार्या.७), दालन क्रमांक ३५३, तिसरा मजला, विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांचेशी संपर्क साधावा. सदर साहित्यांचे निरिक्षण कार्यालयीन वेळेतच करता येईल.

४) सदर साहित्य खरेदी खरेदी करु इच्छिणाऱ्या व्यक्तीस/संस्थेस "साहित्य जेथे जसे आहे तशाच स्थितीत" या तत्वावर घ्यावी लागतील.

५) यशस्वी निविदा धारकास निविदा स्विकृत केली असल्याचे कळल्यापासून, रोख रक्कम भरुन एक आठवडयात सदर साहित्याचा ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल.

६) यशस्वी निविदाधारक नियम व अटी करारांची पूर्तता करु शकत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निविदा रद्द करण्यात येईल.

७) सदर साहित्य स्वजबाबदारीवर व स्वखर्चाने या विभागातून घेवून जावे लागेल.

८) एका निविदाधारकास एकच निविदा सादर करता येईल.

९) कोणतेही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा निविदा स्विकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्यांचा किया रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

१०) आपली सेवा समाधानकारक नसल्यास, कोणतेही कारण न देता (कराराची मुदत वाढविणे, कमी करणे किंवा सेवाकरार रद्द करणे यापैकी सोईस्कर असलेला निर्णय आपणास बंधनकारक राहील) सदर सेवा करार भंग करण्याचे अधिकार प्रधान सचिव व विधि परामर्शी विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांच्याकडे राहतील. त्याचप्रमाणे पुढील सेवाकरार होईपर्यंत विभागास आवश्यकता भासल्यास त्याच दरात आणि अटी व शर्तीच्या अधीन राहून सेवासुविधा पुरविणे आपणास बंधनकारक राहील.

११) निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या स्क्रॅपधारकास उपरोक्त मुद्या क्र.१ ते १० या बाबींची लेखी हमी तसेच कोणत्याही शासकीय/निमशासकीय विभागातर्फे काळ्या यादीमध्ये नाव समाविष्ट नसल्याची हमी रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर दयावी लागेल.

उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे तांत्रिक लिफाप्यामधील फॉर्म "अ" मध्ये नमूद असेल तरच निविदाकाराच्या निविदेबाबत विचार करण्यात येईल.

(शैलेश खाडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवड नस्ती, का. ७.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

Email ID : lnjd-desk७@mah.gov.in दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संकीर्ण- २०२६/प्र.क्र.२२/का. ७ दिनांक : १० एप्रिल, २०२६.

लिफाफा १ : तांत्रिक दरपत्रक (प्रपत्र-अ)

| | | |
|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे/पुरवठादाराचे /संस्थेचे नाव | |
| २ | कार्यालयाचा संपूर्ण पत्ता ( पुरावा सोबत जोडण्यात यावा) उदा. महानगरपालिकाचे कर भरणा देयक/दुरध्वनी देयक किंवा विद्युत भरणा देयकांची छायाकिंत प्रत. | |
| ३ | दूरध्वनी (संस्था/कंपनी),मोबाईल क्रमांक, ईमेल:- | |
| ६ | पॅन कार्ड व आधार कार्ड छायांकित प्रत. साक्षांकित केलेली प्रत सोबत जोडण्यात यावी. | |
| ७ | वस्तू व सेवा कर ( GST ) प्रमाणपत्राची छायाकिंत प्रत. साक्षांकित केलेली प्रत सोबत जोडण्यात यावी . | |
| | मागील तीन वर्षाचे आयकर भरणा करण्यात आलेल्या प्रतीची छायांकित प्रत. साक्षांकित केलेली प्रत सोबत जोडण्यात यावी . | |
| ८ | व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणा-या विविध नोंदण्या:- उदा:- दुकाने व संस्था अधिनियम १९४८: प्रमाणपत्र देणारे कार्यालय/प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक/वैद्यतेची मुदत त्याचप्रमाणे उद्योग आधार कार्यालय/ प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक/वैद्यतेची मुदत इ. छायाकिंत प्रत साक्षांकित केलेली सोबत जोडण्यात यावी. | |
| ९ | आपल्या संस्थेने/कंपनीने मागील ३ वर्षात शासकीय/निमशासकीय कार्यालयांकडून स्क्रॅप खरेदी केलेली असल्यास त्याबाबतचे आदेश/पूर्वानुभव कागदपत्रे. तसेच समाधानकारक काम केल्याबाबतचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. | |
| १० | कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्था/विभागातर्फे काळया यादीमध्ये समावेश नसल्याबाबत रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमी द्यावी. | |
| ११. | संस्थेची महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे नोंदणी केल्याचे वैध कालावधीचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत. साक्षांकित प्रत जोडावी. | |

दिनांक : निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का.

स्थळ :

सूचना:- दरामध्ये गिरवणे (ओव्हररायटिंग) तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड पांढरी शाई लावणे टाळावे तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी.
निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

Email ID : lnjd-desk७@mah.gov.in दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संकीर्ण- २०२६/प्र.क्र.२२/का. ७ दिनांक : १० एप्रिल, २०२६.

लिफाफा २ : अतांत्रिक वित्तीय दरपत्रक (प्रपत्र-ब)

१. निविदाधारकाचे/पुरवठादाराचे पूर्ण नांव : ---------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता : -------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक :अ) कार्यालय: ----------------- ब)मोबाईल नं. -------------------

४. E-mail Address: ---------------------------------------------------

सूचना:- दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, गिरवणे (ओव्हररायटिंग) पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

विभागातील निर्लेखन केलेल्या Compatible टोनर व ड्रम विक्री यादी

| अ.क्र. | तपशिल | नग | दर (प्रति नग) |
|---|---|---|---|
| १ | Compatible टोनर | २१४ | |
| २ | Compatible ड्रम | ०८ | |
| ३ | एकूण संख्या | २२२ नग + दरकरार हाईपर्यंतच्या दिनांकापर्यंत जमा होणारी टोनर व ड्रम संख्या | |

दिनांक : निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का.

स्थळ :